# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात उच्चभ्रू वर्गातही विशेषतः महिला वर्गात क्रॅश डाएटमुळे क्षयरोगाची समस्या वाढत असल्याची बाब

**(१) ५२३८ (०७-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उच्चभ्रू वर्गातही विशेषतः महिला वर्गात क्रॅश डाएटमुळे क्षयरोगाची समस्या वाढत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रॅश डाएटिंगमुळे रोगप्रतिकार शक्ती कमी होवून क्षयरोगाची लागण जलद गतीने होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झीरो फिगर चे वाढता प्रसार आणि क्रॅश डाएट देणा-या व्यवसायिकांच्या विरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१५-१०-२०१७) :**(१) देशात व महाराष्ट्र राज्यात क्षयरोग हा आजार सर्व वयोगटातील स्त्री-पुरुषांमध्ये आणि श्रीमंत व गरीबांमध्येही आढळून येतो. क्षयरोग हा आजार मायकोबॅक्टेरिअम ट्युबरक्युलोसिस या जीवाणूमुळे होतो. फुप्फुसाचा क्षयरोग झालेल्या रुग्णाच्या शरीरातून खोकताना व शिंकताना या आजाराचे जिवाणू हवेत फेकले जातात व हे जीवाणू रुग्णांच्या निकट सहवासात असलेल्या निरोगी व्यक्तीच्या शरीरात श्वासावाटे प्रवेश करतात आणि त्या निरोगी व्यक्तीस क्षयरोग होवू शकतो. अशा पध्दतीने क्षयरोगाचा प्रसार हा मायकोबॅक्टेरिअम ट्युबरक्युलोसिस या जीवाणुदूषित हवेमार्फत होतो. क्रॅश डाएटमुळे क्षयरोगाचा प्रसार होत नाही. त्यामुळे राज्यात उच्चभ्रू वर्गात किंवा महिला वर्गात क्रॅश डाएटमुळे टी.बी.ची समस्या वाढत आहे, हे खरे नाही.

(२) क्षयरोगाचा आजार मायकोबॅक्टेरिअम ट्युबरक्युलोसिस या जीवाणूमुळे होत असून क्रॅश डाएटिंगमुळे टी.बी.ची लागण जलदगतीने होते, हे खरे नाही.

(३) क्षयरोगाचा प्रसार क्रॅश डाएटमुळे होत नसल्याने संबधितांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्हयात शालेय आरोग्य तपासणी मोहिमे मागील शैक्षणिक वर्षात राबविली नसल्याबाबत**

**(२) २५७७४ (१०-०८-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयात शालेय आरोग्य तपासणी मोहिमेअंतर्गत मागील शैक्षणिक वर्षात वैद्यकीय पथक आणि शिक्षण विभाग यांच्यात नियोजन नसल्यामुळे ही योजना राबविली गेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय आरोग्य तपासणी योजनेंतर्गत उपलब्ध वाहन आणि संबंधित वैद्यकीय पथक यांनी केलेल्या कामाचा आढावा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात वैद्यकिय पथकाने किती शाळेमध्ये तपासणी केली आहे, तसेच सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात वर्षभराच्या कार्यक्रमाची आखणी व नियोजन करण्यात आले आहे काय, तपासणी केली असल्यास त्यात कोणते निष्कर्ष काढण्यात आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-११-२०१७) :**(१) हे खरे नाही. जालना जिल्हयात आरोग्य तपासणी मोहिमेअंतर्गत मागील शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत कार्यरत वैद्यकीय पथके आणि शिक्षण विभाग यांच्या समन्वयाने नियोजन करून प्रतिदिन कामकाजाचा कृती आरोखडा तयार करण्यात आला. त्यानुसार विद्यार्थ्यांच्यी शालेय आरोग्य तपासणी पथकामार्फत केली आहे.

(२) हे खरे नाही. शालेय आरोग्य तपासणी योजना अंतर्गत उपलब्ध वाहने आणि संबंधित वैद्यकिय पथक यांनी केलेल्या कामाचा अहवाल वरिष्ठ अधिका-यांनी नियमितपणे वारंवार घेतलेला आहे.

(३) सन २०१४-१५ या शेक्षणिक वर्षात वैद्यकिय पथकांनी २०४२ शाळांना भेटी देऊन पथकांनी ३८२१७९ मुलांची तपासणी केली आहे. सन २०१५ -१६ या शैक्षणिक वर्षभराचा प्रति त्रैमासिक कार्यक्रमाची आखणी व नियोजन करण्यात आले आहे व शालेय मुलांची आरोग्य तपासणी करून त्यांच्या आढळणा-या आजारांवर उपचार करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एन.आर.एच.एम. अंतर्गत येणाऱ्या कंत्राटी आयुष वैद्यकीय अधिकारी यांना सेवेत कायम करण्याबाबत**

**(३) ३४७६३ (२१-०१-२०१६). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एन.आर.एच.एम. अंतर्गत येणाऱ्या कंत्राटी आयुष वैद्यकिय अधिकारी यांना वेतन श्रेणी समान नसल्यामुळे राज्यातील आयुष वैद्याकिय अधिकारी यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी आयुष वैद्याकिय अधिकारी यांना इतर राज्याच्या तुलनेत कमी वेतन देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सबधीत कंत्राटी आयुष वैद्याकिय अधिकारी यांना सेवेत नियमित कारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणारी विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-११-२०१७) :**(१) राज्यातील कंत्राटी आयुष वैद्यकीय अधिकारी यांना वेतन श्रेणी लागु नसुन केंद्र शासनाकडून मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्या नुसार एकत्रित वेतन देण्यात येते. त्यांच्या वेतनात वाढ करण्याबाबत वारंवार मागणी करण्यात येत होती. त्यानुसार वाढीव मानधनाचा अंतर भाव करुन पुरवणी आराखडा केंद्र शासनास माहे जानेवारी २०१६ मध्ये सादर करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) राष्ट्रीय आरोग्य अभियान हा कार्यक्रम कालमर्यादीत स्वरुपाचा असुन कंत्राटी आयुष वैद्यकीय अधिकारी यांना सेवेत नियमित करण्याबाबत केंद्र शासनाकडून कोणत्याही मार्गदर्शक सुचना प्राप्त झालेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात औषध खरेदी महामंडळ नेमण्याबाबत**

**(४) ५६४२० (३०-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य वैद्यकीय शिक्षण, महिला बालकल्याण, आदिवासी अशा विविध विभागांना औषधाची खरेदी करावी लागत असुन एकच औषध कंपनी या सगळ्या विभागांशी वेगवेगळ्या दरांचा करार असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तामिळनाडू आणि कर्नाटक राज्यासारखे मा. मुख्यमंत्र्यांनी औषध खरेदी महामंडळ नेमण्याची घोषित केले असून परंतु त्यानंतर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०७-११-२०१७) :**(१) माहे एप्रिल, २०१६ दरम्यान सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महिला व बालविकास विभाग, आदिवासी विकास विभाग तसेच अन्य विभांगाकडून औषध खरेदीसाठी स्वतंत्रपणे खरेदी प्रक्रिया राबविली जात होती. त्यामुळे काही बाबींसाठी वेगवेगळे दर प्राप्त होण्याची शक्यता होती.

(२) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांसाठी औषधे, तदअनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे इत्यादी बाबींचीं खरेदी व वितरण हाफकिन बायो- फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. या महामंडळाकडे सोपविण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून त्याबाबत दिनांक २६.०७.२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील ४३७ शालेय विद्यार्थीहृदयाच्या विविध विकारांनी व 786 विद्यार्थी अन्य गंभीर आजाराने ग्रस्त असल्याबाबत

**(५) ७०२७५ (१०-०१-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील विद्यार्थ्यांची राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत करण्यांत आलेल्या तपासणीत ४३७ विद्यार्थी हृदयाच्या विविध विकारांनी ग्रस्त असल्याचे तर ७८६ विद्यार्थी अन्य गंभीर आजाराने ग्रस्त असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व आजाराची विविध कारणे काय आहेत तसेच सदरचे आजार होऊ नयेत म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यांत येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-११-२०१७) :**(१) माहे एप्रिल २०१३ ते माहे जुलै २०१६ अखेर एकुण ४३७ विद्यार्थी हृद्य विकाराचे आढळून आलेले आहेत. तसेच ७८६ विद्यार्थी हे इतर गंभीर आजाराचे आढळून आलेले आहेत.

(२) व (३) सदर आजार विविध वैद्यकिय कारणाने होतात.

बुलढाणा जिल्ह्यात आढळून आलेल्या एकूण ४३७ हृदय विकाराच्या विद्यार्थ्यापैकी मार्च २०१७ अखेर पर्यंत १५९ विद्यार्थांवर शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत. तसेच एकूण ७८६ इतर गंभीर आजार असलेल्या विद्यार्थापैकी मार्च २०१७ अखेर पर्यंत ५५६ विद्यार्थांवर यशस्वी शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत. उर्वरीत बालकांवर वैद्यकिय उपचार किंवा शस्त्रक्रिया करून घेण्याची प्रक्रिया जिल्हास्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात विशेषत: उस्मानाबाद, नंदुरबार आदी जिल्हयात खोटे जात प्रमाणपत्रे बनवून राखीव जागांवर प्रवेश घेतल्याबाबत**

**(६) ७३८०८ (१९-०४-२०१७). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विजय औटी (पारनेर), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: उस्मानाबाद, नंदुरबार आदी जिल्हयात अनुसूचित जमातीच्या नावाने खोटी जात प्रमाणपत्रे बनवून नामांकित वैद्यकीय महाविद्यालयामधील राखीव जागांवर प्रवेश घेण्याचे रॅकेट सन २००१ पासून सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) तसेच एमबीए आणि अभियांत्रिकी अशा अनेक अभ्यासक्रमामध्ये हजारो विद्यार्थीनी खोट्या प्रमाणपत्रासाठी डॉक्टराने प्रत्येकी रुपये ५ ते २० लाख घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, बनावट कागदपत्रे बनविणाऱ्यांवर व खोट्या प्रमाणपत्रांच्या आधारे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-११-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) याबाबतची माहिती निदर्शनास आलेली नाही.

(३) संबंधित दोषी विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करुन त्यांच्याविरुध्द त्या त्या महाविद्यालयामार्फत गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे व त्याची पुढील चौकशी पोलीस विभागामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या वन उद्यान योजनेंतर्गत राज्यात २६ वन उद्यानाला येत्या ५ वर्षात केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेबाबत**

**(७) ७३८७९ (१७-०४-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नगर वन उद्यान योजनेंतर्गत येत्या ५ वर्षात राज्यात २६ वन उद्यानाला केंद्र शासनाची मान्यता मिळालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासन पुरस्कृत नगर वन उद्यान योजनेचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू योजनेंतर्गत राज्यातील कोणत्या २६ वन उद्यांनाना केंद्र शासनाची मंजूरी मिळालेली आहे,
(४) सदरहू वन उद्यान योजनेंतर्गत मंजूरी मिळालेल्या वन उद्यानाच्या उभारणीच्या कामास प्रत्यक्षात केव्हापासून सुरूवात करण्यात येणार आहे व ही कामे किती कालावधीत पूर्ण होतील ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-११-२०१७)** :(१) हे खरे नाही.

राज्यात २६ नगर उद्यान निर्माण करावयाची आहेत. त्यापैकी ५ नगर वन उद्यान निर्माण करण्यास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहेत.
(२) सन २०१६-१७ पासून पुढील ५ वर्षात राज्यात एकूण २६ महानगरपालिका/नगरपालिका (वर्ग-१) अंतर्गत येणाऱ्या शहरांमध्ये किमान १ नगर वन उद्यानाची निर्मिती करावयाची आहे.
(३) केंद्र शासनाने खालील ५ नगर उद्यांनांना मान्यता दिलेली आहे.

१) पाचगांव पर्वती (पुणे)
२) वारजे (पुणे)
३) अंबाझरी (नागपूर)
४) चंद्रपूर
५) मुडशिंगी (कोल्हापूर)

(४) नगर वन उद्यान निर्माण करणे या योजनेंतर्गत मंजूरी दिलेल्या ५ नगर वन उद्यानांची निर्मिती करण्याची कामे ऑक्टोबर २०१६ पासून सुरूवात झालेली आहेत. सन २०१६ -१७ पासून पुढील ५ वर्षात "नगर वन उद्यान निर्माण करणे" ही योजना राबविण्यात येणार आहे.

---

**महिला व बालविकास विभागाच्या 'माझी कन्या भाग्यश्री' योजनेबाबत**

**(८) ७५६७२ (१९-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागाने 'माझी कन्या भाग्यश्री' योजनेअंतर्गत एका मुलीच्या जन्मानंतर मातेने कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास मुलीचा जन्म दिन साजरा करण्यासाठी पाच हजार रुपये पालकांना देण्याचे माहे डिसेंबर २०१५ मध्ये जाहिर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, 'माझी कन्या भाग्यश्री' योजनेला राज्यात अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी या योजनेसाठी काम न केल्याने योजना लोकांपर्यंत पोहोचत नसून याबाबत अधिकृत आकडेवारी संबंधित अधिकाऱ्यांकडे मागितली असता अशी आकडेवारी उपलब्ध नसल्याची निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच राज्यात सदरील कुटूंब नियोजनाची योजना प्रभाविपणे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-१०-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) महिला व बाल विकास, शासन निर्णय दिनांक २६ फेब्रुवारी, २०१६ अन्वये राज्यात माझी कन्या भाग्यश्री ही योजना १ एप्रिल २०१६ पासून लागू करण्यात आली होती.तसेच सदर शासन निर्णयातील तरतूदींबाबत क्षेत्रिय स्तरावरील अधिकाऱ्यांमध्ये संदिग्धता असल्यामुळे सदर शासन निर्णयाबाबत दिनांक २२.०२.२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये शासनामार्फत स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.

तसेच शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग दि. ०१.०८.२०१७ अन्वये सदर योजनेत बदल करण्यात आले असून सुधारीत माझी कन्या भाग्यश्री योजना लागू करण्यात आली आहे.
(४) सदरील योजना राज्यात प्रभाविपणे राबविण्यासाठी १ मे २०१७ रोजीच्या ग्रामसभेत योजनेबाबतचा शासन निर्णय व परिपत्रकाचे वाचन करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे सन २००५ ते २०१५ या कालावधीत दाखल झालेल्या रुग्णांची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(९) ७५८८९ (१५-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे सन २००५ ते २०१५ या कालावधीत दाखल झालेल्या रुग्णांची ७५० हून अधिक प्रकरणे कारवाई शिवाय पडून असून त्यापैकी ६०० प्रकरणांची प्राथमिक पडताळणीची प्रक्रियाही केली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी शासनाने केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-११-२०१७) :**(१) हे खरे नाही, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे २००५ ते २०१५ या कालावधीत ८४१ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी ३१७ तक्रारी निकाली काढल्या असून ५२४ तक्रारीची प्राथमिक पडताळणी झालेली आहे.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या स्तरावर चौकशी सुरु आहे.
(३) चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित प्रकरणे काढण्याबाबतची कार्यवाही, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील शाळांमध्ये शालेय आरोग्य तपासणी होत नसल्याबाबत**

**(१०) ८१६६१ (२०-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील शाळांमध्ये शासनाच्या धोरणानुसार शालेय आरोग्य तपासणी उपक्रम राबविला जातो मात्र गेल्या काही दिवसापासुन शासनाने नेमलेल्या आरोग्य पथकाकडून विदयार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय विदयार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले असून आरोग्य विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे तसेच शासनाची स्पष्ट भूमिका काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-११-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
शाळा तपासणीचे काम नियमितपणे चालू होते व सद्यस्थिती देखील तपासणी चालू आहे. तरी वाहनांचा करार संपूष्टात आल्याने दि.६ मे, २०१७ ते दि.१८ मे, २०१७ या कालावधीमध्ये तपासणी होवू शकली नाही. परंतू सदर कालावधीमध्ये राहिलेली तपासणी पूर्ण करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) नियमीत आरोग्य तपासणी सुरू असल्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.
शाळा तपासणीचे काम नियमितपणे चालु ठेवण्याचीच शासनाची भुमिका आहे.

---

**मालेगांव (जि.वाशिम) तालुक्यामधील पाझर तलाव व गांव तलावास मान्यता देऊन त्यावर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(११) ८२१०७ (१५-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.वाशिम) तालुक्यामधील १९ खेडे ही मिनी माडा पॉकेट मध्ये समाविष्ट असून सदर मिनी माडा पॉकेट परिक्षेत्रातील आदिवासी भागात पिपंळवाडी, गांगलवाडी,

कोल्हापूरी बंधारे सूदी पाझर तलाव व सावळद गाव तलाव १, २, ३, ४ ही सिचनांची प्रकल्पात तांत्रीक दृष्ट्या सफल आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूरी बंधारे, पाझर तलाव व गांव तलावास मान्यता देऊन त्यावर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३०-१०-२०१७) :**(१) (i) पिंपळवाडी कोल्हापुरी बंधा-याचे अंदाजपत्रक शासनास सादर केले असून ते क्षेत्रीय यंत्रणेने सादर केलेल्या माहितीवरुन शासनाच्या मापदंडात सफल आहे.

(ii) सूदी पाझर तलाव विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम डिपीआर क्र.४ मध्ये प्रस्तावित असल्याने व सदर डिपीआर मंजूर नसल्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(iii) सावळद गाव तलाव १, २, ३, ४ हे विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमाच्या मापदंडात असफल आढळून येतात.

(iv) गांगलवाडी कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा जलसंधारण विभागाशी संबंधीत नाही.

(२) हे खरे आहे.

(३) (i) सावळद गाव तलाव १, २, ३, ४ हे शासनाच्या मापदंडात बसत नाही. त्यामुळे पुढील कार्यवाही झाली नाही.

(ii) पिंपळवाडी कोल्हापुरी पद्धतीचे बंधारा अंदाजपत्रक मंजूरीस्तव सादर केला आहे.

(iii) सुदी पाझर तलाव विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमाच्या डिपीआर क्र.४ मध्ये प्रस्तावित होते. तसेच विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमातंर्गत निधी प्राप्त न झाल्याने सदर प्रस्ताव विचारात घेता आला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्हयातील सात प्रकल्पांना वन विभागाचे एफआरए ॲक्ट २००६ चे प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**(१२) ८२६३७ (१५-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील सात सिंचन प्रकल्पाना वन विभागाचे ॲक्ट २००६ चे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडून मा.वने मंत्री यांना शिफारस करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास एक निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वनजमिन वळतीकरणाचे प्रस्ताव केंद्र शासनास सादर करतेवेळी संबंधित जिल्हाधिकारी यांचे अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. वाशिम जिल्हयातील ८ प्रकल्पांकरीता आवश्यक असलेले सदर प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, वाशिम यांचेकडून प्राप्त झाले आहे. सदर ८ प्रकल्पापैकी एका प्रकल्पास केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे तर ५ प्रकल्पांना तत्वत: मान्यता प्राप्त झाली आहे. तत्वत: मान्यता प्राप्त ५ प्रकल्पांपैकी २ प्रकल्पांचा अटीपूर्तता अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे व ३ प्रकल्प अटीपूर्ततेकरीता प्रकल्प यंत्रणेच्या स्तरावर प्रलंबित आहेत. उर्वरीत २ प्रकल्पांबाबत केंद्र शासनाने त्रुटी उपस्थित केल्या असून सदर प्रकल्प त्रुटीपूर्ततेकरीता प्रकल्प यंत्रणेच्या स्तरावर प्रलंबित आहेत.

---

**मायणी (ता.खटाव, जि.सातारा) येथील छत्रपती एज्युकेशन सोसायटीच्या आय.एस.एम.आर. मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी परिक्षेपासून वंचित राहिल्याबाबत**

**(१३) ८३१८५ (१५-०४-२०१७). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मायणी (ता.खटाव, जि.सातारा) येथील छत्रपती एज्युकेशन सोसायटीच्या आय.एस.एम.आर. मेडिकल कॉलेजने चुकीच्या पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविल्याने सुमारे ९५ विद्यार्थी यावर्षीच्या परिक्षेपासून वंचित राहिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विद्यार्थी व पालकांनी कॉलेज प्रशासनाच्या विरोधात माहे जानेवारी, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात उपोषण व आंदोलन सुरु केले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-११-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१४-१५ मधील प्रवेशित विद्यार्थी जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे उपोषणास बसले होते.

(३) विद्यार्थ्यांचे प्रवेश चुकीच्या पध्दतीने झाले असल्याने त्यांचे प्रवेश नियमित करण्यासंदर्भातील व विद्यार्थ्यांना इतर महाविद्यालयात स्थलांतरित करण्याबाबतची याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे.

(४) विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांना अन्य महाविद्यालयात स्थलांतरित करण्यास मान्यता देण्याची भारतीय आयुर्विज्ञान परिषदेस राज्य शासनामार्फत विनंती करण्यात आली होती. तथापि, परिषदेने सदर विनंती अमान्य केली आहे.

तसेच संबंधित महाविद्यालयाची राज्य शासनाने मान्यता रद्द केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कुंभोज व तमदलगे (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील जलयुक्त शिवाराच्या कामांबाबत**

**(१४) ८४०३३ (१९-०४-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुंभोज व तमदलगे (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील जलयुक्त शिवाराच्या कामांना कोणत्याही प्रकारची मंजूरी न घेता शेरे, सही व शिक्का बनावट असल्याचे कार्यकारी अभियंत्यांनी उपवन अभियंत्यांना माहिती देऊनही तत्कालिन उपवनसंरक्षक यांनी तांत्रिक मंजूरीसह सर्व कायदेशीर दर्शविल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे कुंभोज व तमदलगे या गावातील कामांना कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी तांत्रिक मान्यता दिली असून उप वनसंरक्षक, कोल्हापूर यांनी तांत्रिक मंजूरी दिलेली आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करीता, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीकडून स्वतंत्र अभिप्राय मागविण्यात आले होते त्यानूसार उपवनसंरक्षक वनविभाग कोल्हापूर यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

(३) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या झालेल्या नुकसानीची रक्कम निश्चित करण्यासाठी उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर व लेखा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर यांची व्दिसदस्यीय समिती नियुक्त केलेली आहे. समितीचा अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील तिलारी खोऱ्यांत हत्तीच्या कळपाने शेतीचे व बागायतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याबाबत**

**(१५) ८४९७० (१६-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील तिलारी खोऱ्यातील हेवाळे, बाबुळवाडी, घाटीवडे, बांबर्डे या परिसरात माहे मे, २०१७ मध्ये परप्रांतातून आलेल्या हत्तीच्या कळपाने शेतीचे व बागायतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी असे आदेश वन संरक्षक यांनी वन क्षेत्रपाल यांना दिनांक १३ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आदेशाच्या अनुषंगाने पंचनामे पूर्ण करुन बागायती शेतकऱ्यांना किती नुकसान भरपाई अदा करण्यात आली वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-११-२०१७)** :(१) हे खरे आहे.

दोडामार्ग वनपरिक्षेत्रामध्ये तिलारी धरण परिसरात हेवाळे, बाबरवाडी, घाटीवडे, बांबर्डे येथे माहे मे, २०१७ मध्ये १५ ठिकाणी विविध शेतकऱ्यांचे नारळ, केळी, सुपारी यांचे हत्तीने नुकसानी केलेचे आढळून आले आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि माहे मे, २०१७ मध्ये १५ प्रकरणामध्ये ९ जुलै, २०१५ चे शासन निर्णयानुसार नुकसानी धनादेशाद्वारे अदा करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी एकूण १५ प्रकरणात रक्कम रूपये ३,८०,९८०/- धनादेशाद्वारे अदा करण्यात आली आहे.

---

**पालघर जिल्ह्यातील कुपोषित बालकांना खाजगी रुग्णालयातर्फे मोफत उपचार देण्याबाबत**

**(१६) ८४९७७ (१२-०८-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील कुपोषणाची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत असल्याने शासनाने मुंबईतील नामांकित रुग्णालयातर्फे कुपोषितांच्या तपासण्या व मोफत वैद्यकीय उपचार सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनेक जिल्हयात कुपोषणाचे अतिप्रमाणात असल्याने राज्यात सर्वत्र नामांकित खाजगी रुग्णालयांची मोफत सेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-१०-२०१७)** :(१) पालघर जिल्हयामध्ये मुंबईमधील वाडीया हॉस्पिटल, ग्लोबल हॉस्पिटल, सूर्या हॉस्पिटल, हिंदुजा हॉस्पिटल व जसलोक हॉस्पिटल या रुग्णालयातील तज्ञांमार्फत शिबीरे आयोजित करुन माता व बालकांना निदान व उपचाराच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

(२) राज्यामध्ये विविध आरोग्य कार्यक्रमांतर्गत खाजगी वैद्यकिय व्यावसायिकांच्या सेवा उपलब्ध करुन घेतल्या जातात.
उदा. - मानव विकास कार्यक्रम(HDP), प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान(PMSMA), भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके (IPHS),
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे आकुर्डी (ता.भुदरगड, जि.सोलापूर) येथे गव्यांनी केलेल्या हल्ल्यात दोन शेतकऱ्यांचा झालेला मृत्यू**

**(१७) ८४९८७ (११-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आकुर्डी (ता.भुदरगड, जि.सोलापूर) येथे परप्रांतातील गव्यांनी केलेल्या हल्ल्यात दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे दिनांक १२ मे, २०१७ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापरिसरात वारंवार परप्रांतातील वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे मृत्युच्या घटना घडतात त्यामुळे वन व महसूल विभागाने कोणत्या संरक्षणात्मक उपाययोजना केल्या आहेत व मृत्यु पावलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली आहे वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-११-२०१७) :**
(१) मौजे आकुर्डे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथे दिनांक १२.०५.२०१७ रोजी गवा या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात श्री. रघुनाथ शिंदे व श्री. अनिल पोवार या दोन व्यक्तींचा मुत्यू झाला हे खरे आहे.
(२) प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार दिनांक १२.०५.२०१७ रोजी गवा या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मुत्यू झालेल्या दोन व्यक्तींच्या कायदेशीर वारसास प्रत्येकी रु.८.०० लक्ष आर्थिक मदत देण्यात आली आहे.
मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रामणे उपाययोजना राबविण्यात येतात.
• स्थानिक क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी, फिरते पथक, संरक्षण पथक यांचेमार्फत नियमित गस्तीद्वारे वन्यप्राण्यांच्या हालचालींचे संनियंत्रण करण्यांत येते, याकरिता साधन सामुग्री जसे कॅमेरा ट्रॅप, दुर्बिण व जीपीएस यांचा वापर करण्यांत येतो.
• वन्यप्राणी उन्हाळयामध्ये पिण्याच्या पाण्याच्या शोधात नागरी वस्त्यांकडे फिरकू नये, त्यांना वनातच पिण्यांचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनतलाव / खोदतळे बांधणे, कृत्रिम पाणवठे, (सिमेंट टाके बांधणे) इत्यादी उपाययोजना करण्यांत आलेल्या आहेत.

• ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे व मानव वन्यजीव संघर्षाला आळा बसावा म्हणून विविध योजनेतून एलपीजी गॅसचा पुरवठा करण्यांत आला आहे.
• वन्यप्राणी मानवी वस्तीत येऊ नये याकरीता प्रामुख्याने वनक्षेत्राच्या हद्दीवर वन्यप्राणी प्रतिबंधक चर काढण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात डेंग्यूच्या रुग्णांकडून चाचणीसाठी भरमसाठ शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत**

**(१८) ८४९९१ (२१-०८-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ-मोठ्या शहरामधून हजारो डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डेंग्यू झालेले रुग्ण व डेंगू सदृष्य रुग्ण यांच्या तपासणी चाचणीसाठी रुग्णाकडून भरमसाठ शुल्क आकारली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार रुग्णाकडून कमी शुल्क आकारण्याबाबत तसेच डेंग्यूची साथ आटोक्यात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३१-१०-२०१७) :**(१) होय, हे अंशतः खरे आहे.

राज्यात मोठ्या शहरांमध्ये (मनपा क्षेत्रांमध्ये) माहे जानेवारी ते ऑगस्ट, २०१७ अखेरपर्यंत एकूण १०५४ डेंग्यु रुग्ण आढळून आलेले आहेत.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.
(३) होय.

राज्यात डेंग्यु निदानासाठी जिल्हा रुग्णालये तसेच काही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अधिकृत सेंटिनल सेंटर्स शासनाने सुरु केली आहेत. तसेच एन.आय.व्ही., पुणे येथेही डेंग्यु निदान करण्यात येते. सदर सर्व ठिकाणी ही तपासणी नि:शुल्क करण्यात येते.

तथापी, राज्यातील काही खाजगी रुग्णालये अथवा खाजगी प्रयोगशाळांमध्ये डेंग्यु निदान चाचणीसाठी अवाजवी शुल्क आकारण्यात येत होते. त्यासाठी खाजगी रुग्णालये व खाजगी प्रयोगशाळा आकारत असलेल्या शुल्कावर नियंत्रण आणण्याकरिता शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने दि.२८ सप्टेंबर, २०१६ रोजी डेंग्यु निदान चाचणीसाठी रु.६००/- पेक्षा जास्त शुल्क आकारणी करण्यात येऊ नये, असा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

तसेच डेंग्युची साथ आटोक्यात आणण्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या व येत आहेत.

* आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण.
* उद्रेकाच्या ठिकाणी जलद ताप रुग्ण सर्वेक्षण.
* साथरोग उद्रेकाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी जिल्हा पातळीवर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत.
* ताप रुग्णांचे रक्तजल नमूने घेऊन सेंन्टीनल हॉस्पीटल येथील प्रयोगशाळेत मोफत तपासणी.
* राज्यात डेंग्यू विषाणूजन्य तापाच्या निदानासाठी ३७ सेंटीनल सेंटर्सची स्थापना केली असून राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे येथेही निदानाची व्यवस्था आहे.
* राज्यात गप्पीमासे पैदास केंद्र कार्यरत असून राज्यातील डासोत्पत्ती स्थानांमध्ये गप्पीमासे सोडणे.
* नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
* उद्रेकग्रस्त ठिकाणी किटकनाशकाची धूरफवारणी.
* शासकीय तसेच खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचे डेंग्यु रुग्ण व्यवस्थापन विषयक कार्यशाळेचे आयोजन.
* डेंगी रुग्णांना लक्षणाधारीत उपचार.
* सर्व आरोग्य संस्थांना औषधे व इतर साधन सामुग्रीचा पुरेसा पुरवठा.
* १६ मे, २०१६ हा दिवस राष्ट्रीय डेंग्यु दिवस म्हणून विविध उपक्रमाद्वारे साजरा केला.
* दरवर्षी जुलै महिना डेंगी विरोधी महिना म्हणून साजरा केला जातो.
* शालेय डेंग्यु जागृती मोहिम.
* उद्रेकग्रस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा/विभागीय/राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या भेटी.
* विविध माध्यमांद्वारे जनतेस आरोग्य शिक्षण.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील खासगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या वैद्यकीय शिक्षणासाठी व्यवस्थापन कोट्यातून विद्यार्थ्यांकडून भरमसाठ शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत**

**(१९) ८५२०५ (१६-०८-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासगी व्यावसायिक महाविद्यालयाच्या वैद्यकीय पदव्युतर पदवी अभ्याक्रमासाठी संस्थाचाकांनी व्यवस्थापन कोटयातील शुल्कात प्रचंड प्रमाणात वाढ करण्यात आली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील काही नामांकित वैद्यकीय महाविद्यालयात ५० ते ९७ लाख रुपयांपर्यंत वर्षाला शुल्क आकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खासगी वैद्यकीय महाविद्यालयांतील व्यवस्थापन कोटयातील शुल्कवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांनी व्यवस्थापनाचे शैक्षणिक शुल्क हे शुल्क नियामक प्राधिकरणांच्या नियंत्रित आकडयापर्यंत केल्याने अशा महाविद्यालयांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पश्चिम भागात राजरोसपणे बेसुमार वृक्षतोड होत असल्याबाबत**

**(२०) ८५५५१ (२१-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पश्चिम भागात बादिवाडे-करंजफेण येथील डोंगर माथ्यावर असणाऱ्या जंगलाची बेसुमार वृक्षतोड केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, बेसुमार वृक्षतोड झाल्याने वन्य प्राण्यांना आणि दुर्लभ औषधी वनस्पतींना धोका निर्माण झाला आहे, हे हि खरे आहे काय
(३) असल्यास शासन सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून वृक्षतोड रोखण्याबाबत तातडीने कार्यवाही करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-११-२०१७) :**(१) कोल्हापूर वनविभागातील पन्हाळा वनपरिक्षेत्रातील मौजे बांदिवडे ता.पन्हाळा, वनकक्ष क्रमांक ८३८ ब, ८३९ एकूण क्षेत्र १०७.२७ हे. व मौजे करंजफेन वनकक्ष क्र.८४० क क्षेत्र पैकी ३१.५६ हे. इतके वनक्षेत्र आहे. सदर वनक्षेत्रात डोंगरमाथ्यावर बेसुमार वृक्षतोड झालेली नाही. या दोन्ही गावापैकी मौजे बांदिवडे येथे सन २०१४ मध्ये १ वनगुन्हा नोंद झाला असून त्यामध्ये ५ झाडांची तोड झाली आहे. जंगल नुकसानाची रक्कम रुपये १६३९/- इतकी आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, ठाणे, वसई आणि नवी मुंबई परिसरातील खाडी किनारी असलेली कांदळवने वाचविण्यासाठी संरक्षण भिंत उभारण्याबाबत**

**(२१) ८५७११ (१६-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, वसई आणि नवी मुंबई परिसरातील खाडी किनारी असलेली कांदळवने वाचविण्यासाठी कांदळवनाच्या हद्दीच्या बाहेर संरक्षण भिंत उभारण्याचा निर्णय राज्याच्या वन विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदळवन परिसराच्या ५० मिटर आत बांधकाम केल्यास त्यावर कारवाई करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने सन २००५ मध्ये वन विभागास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन विभागाने आदेशाच्या अनुषंगाने मुंबईतील छेडानगर, चारकोप व कफपरेड येथील कांदळवन संरक्षणाबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१७) :**(१) मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि नवी मुंबई येथील कांदळवन क्षेत्रात वारंवार होणारे अतिक्रमण अनधिकृत भराव यामुळे सदर कांदळवन क्षेत्राला संरक्षण देण्याचे दृष्टीने संरक्षक भिंत व तारेचे कुंपन बांधण्याचा निर्णय वन विभागाने घेतलेला आहे. त्यानुषंगाने मुंबई शहरातील कुलाबा, मुंबई उपनगरातील मालाड मानोरी, चारकोप आणि नवी मुंबई मधील ऐरोली येथे एकूण २८५५० मी. संरक्षक भिंत बांधण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

(२) मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका ३२४६/२००४ मध्ये दिनांक ६.१०.२०१५ रोजी दिलेल्या आदेशाच्या परिच्छेद ८(३) मध्ये असे नमूद केले आहे की, कांदळवनापासून ५० मीटरच्या परिसरात कोणतेही बांधकाम/भरणी करण्यात येऊ नये असे आदेश संबंधित जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

(३) कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता पुढीलप्रमाणे पावले उचलण्यात आलेली आहेत:-

१. कांदळवन कक्षांतर्गत मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि मिरा - भाईंदर क्षेत्रातील कांदळवनाचे प्रभावीपणे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता सन २०१३ मध्ये मुंबई कांदळवन संधारण घटकाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

२. मौजे छेडानगर येथील क्षेत्र सॉल्ट पॅन विभागाच्या ताब्यात आहे. त्यांचे विनंतीनुसार पोलीस, बृहन्मुंबई महानगरपालिका व वन विभाग यांनी दिनांक १६.३.२०१७ ते दिनांक १८.३.२०१७ रोजी एकुण ८५६ झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले.

३. मौजे चारकोप स.नं. ३९, न.भू.क्र. ४ येथील अतिक्रमणे महसूल विभागाने वन विभाग व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या मदतीने दिनांक १.६.२०१७ ते दिनांक ३.६.२०१७ या कालावधीत निष्कासित करण्यात आलेली आहे. सदर निष्कासन केलेली अतिक्रमणे ही वनक्षेत्र हद्दीबाहेरील आहेत.

४. मौजे कुलाबा स.नं. ६५३ येथील अतिक्रमणे वन विभाग व पोलीस यांच्या सहाय्याने दिनांक ३.५.२०१७ ते दिनांक ६.५.२०१७ या कालावधीत एकुण १२९६ झोपड्यांचे निष्कासन करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलयुक्त शिवार प्रकल्प योजना समितीच्या अहवालाबाबत**

**(२२) ८६०८४ (१९-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गतवर्षातील दुष्काळ व अवर्षण ग्रस्त परिस्थिती निर्मुलनासाठी राज्य शासनाने जलयुक्त शिवार प्रकल्प योजनेची शहानिशा करण्याकरिता माजी प्रशासकीय अधिकारी श्री.जॉनी जॉसेफ यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांची समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीला याबाबतचा अहवाल सादर करण्यासाठी किती महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :**(१) व (२) मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र.१५४/२०१५ वर मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानूसार कार्यवाही करण्यासाठी जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.३१ मे, २०१७ अन्वये श्री.जॉनी जोसेफ, माजी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली ०९ सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे.

समितीस अहवाल सादर करण्यास ०२ महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता तथापि, विषयाचा आवाका लक्षात घेता मा.उच्च न्यायालयाने प्रस्तुत समितीस दि.३० नोव्हेंबर, २०१७ पर्यंत अहवाल सादर करण्यास मुदतवाढ दिली आहे. आतापर्यंत समितीच्या ७ बैठका झाल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नागरिकांमध्ये मरणोत्तर नेत्रदानाविषयी जागरुकतेचा अभाव असल्याबाबत**

**(२३) ८६२२६ (१९-०८-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेत्रदानाच्या जागरुकते अभावी राज्यात २५ हजार तर मुंबईत १२ हजार लोक डोळयांच्या प्रतिक्षेत असल्याची माहिती आरोग्य विभागाद्वारे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान स्पष्ट करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नागरिकांमध्ये मरणोत्तर नेत्रदानाविषयीचे समज गैरसमज व जागरुकतेचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती विशेष मोहिम राबविली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३१-१०-२०१७)** :(१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
मरणोत्तर नेत्रदानाबाबत नागरिकांमध्ये काही प्रमाणात गैरसमज आहेत.
(३) नेत्रदानाविषयीचे गैरसमज दूर करणे व जागरुकता आणण्यासाठी राज्यात सर्व जिल्ह्यात नेत्रदान समुपदेशक नियुक्त करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे रुग्ण व नातेवाईकांना मरणोत्तर नेत्रदानासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी विविध कार्यक्रम, जनजागृती मोहिम व दिवस राबविले जातात. तसेच काचबिंदू, अंधत्व प्रतिबंध सप्ताह, नेत्रदान पंधरवडा इत्यादी कार्यक्रम राबविले जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ममदापूर (ता.येवला, जि.नाशिक) साठवण तलाव या योजनेचा सुधारित प्रस्ताव तांत्रिक मान्यतेअभावी रखडल्याबाबत**

**(२४) ८६२८४ (१९-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ममदापूर (ता.येवला, जि.नाशिक) साठवण तलाव या योजनेचा सुधारित प्रस्ताव तांत्रिक मान्यतेअभावी रखडल्याप्रकरणी प्रशासकीय कार्यवाही करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कारवाई केली तसेच या प्रकल्पाचे काम लवकरात लवकर सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२५-१०-२०१७)** :(१) होय.
(२) व (३) नाही. योजनेच्या प्रारुप निविदा प्रपत्रांना मा.मुख्य अभियंता, पुणे यांचे दिनांक १७/०७/२०१७ चे पत्रान्वये रु.३४३.९९ लक्ष इतकी तांत्रिक मंजूरी मिळालेली असून ई-निविदा कार्यवाही पुर्ण झालेली आहे. सद्यस्थितीत निविदा पत्रांतील तांत्रिक लखोटा उघडण्यात आला असून त्याची छाननी प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाची जलयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी मृद व जलसंधारण विभागाचे औंरगाबाद येथे कार्यालय स्थापन करण्याच्या निर्णयाबाबत**

**(२५) ८६३९१ (११-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाची जलयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी मृद व जलसंधारण विभागाचे औंरगाबाद येथे कार्यालय स्थापन करुन त्यांना नविन कर्मचारी वर्ग व आयुक्त देणार असल्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-११-२०१७) :**(१), (२) व (३) औरंगाबाद येथे संपूर्ण राज्यासाठी मृद व जलसंधारण आयुक्तालयाची स्थापना करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यास अनुसरुन औरंगाबाद येथे संपूर्ण राज्यासाठी मृद व जलसंधारण आयुक्तालयाची स्थापना करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ३१ मे, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला असून आयुक्त, मृद व जलसंधारण, वाल्मी परिसर, औरंगाबाद येथे हे कार्यालय कार्यान्वित झाले आहे.

---

**राज्यातील लहान धरणांतील गाळ काढून तो शेतामध्ये वापरण्याच्या योजनेबाबत**

**(२६) ८६४०२ (१९-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लहान धरणांतील पाण्याच्या साठवण क्षमतेत वाढ करण्यासाठी अशा धरणांतील गाळ काढून तो शेतामध्ये वापरण्याची योजना शासनाने आखली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३०-१०-२०१७) :**(१) होय.

(२) या विभागाच्या शासन निर्णय क्र.गामुध -२०१७/प्र.क्र.१३४/जल-१,दि.०६.०५.२०१७ अन्वये “गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार” या योजनेच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून त्यानुसार योजनेची अंमलबजावणी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंढेरा (ता.देऊळगांव राजा जि.बुलढाणा) शिवारात शेतजमिनीला लागून असलेल्या पश्चिम दिशेच्या ओढयावर निकृष्ट दर्जाचे सिमेंट बंधा-याचे काम झाल्याबाबत**

**(२७) ८६६७१ (१९-०८-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंढेरा (ता.देऊळगांव राजा, जि.बुलढाणा) शिवारात तलाठी सजा भाग क १ मध्ये गट क २९२ मध्ये ०.६० आर शेतजमिनीला लागून पश्चिम दिशेला असलेल्या ओढयावर निकृष्ट दर्जाचे सिमेंट बंधाऱ्याचे काम झाल्याचे नुकतेच माहे मे, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ओढयाचे खोलीकरण व सरळीकरण रात्रीच्या वेळी पोकलॅड मशिन व सिमेंट रेती, गिट्टी मिक्स करणा-या मशिनद्वारे करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलयुक्त शिवार अभियांनातंर्गत खडकपूर्णा प्रकल्पाद्वारे झालेले काम हे ठेकेदार व इंजिनिअर, कार्यकारी अभियंता यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार दोषी व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त बंधाऱ्यासाठी तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील आजरा-आंबोली मार्गावरील हाळोलीनजिकच्या फार्म हाऊसमध्ये टस्कर हत्तीने केलेले नुकसान**

**(२८) ८७२३० (११-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील आजरा-आंबोली मार्गावरील हाळोलीनजिकच्या फार्म हाऊसवर टस्कर हत्तीने मोठया प्रमाणात नुकसान केल्याची घटना माहे एप्रिल, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व तदनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने आतापर्यंत कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-११-२०१७) :**(१), (२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा-आंबोली मार्गावरील हाळोली येथील सौ. राजश्री विजयकुमार पाटील यांचे फार्म हाऊसमधील ११ फळझाडांचे माहे एप्रिल, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात हत्ती या वन्यप्राण्यांनी नुकसान केले आहे. प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधितास रु.१७,२००/- अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे विरहाम (ता.खेड, जि.पुणे) येथे आदिवासी उपयोजनेंतर्गत छोटे पाटबंधारे विभागाने बांधलेला पाझर तलाव फुटल्याबाबत**

**(२९) ८८४५५ (११-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे विरहाम (ता.खेड, जि.पुणे) येथे आदिवासी उपयोजनेंतर्गत छोटे पाटबंधारे विभागाने बांधलेला पाझर तलाव फुटून परिसरातील १० विहिरी तसेच ३१ शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत शासनाने दोषी असणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई प्रस्तावित केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, दोषी असणाऱ्या कंत्राटदारावरील कारवाईचे स्वरूप व त्यानुषंगाने सद्य:स्थिती काय आहे
(३) तसेच पाझर तलाव फुटल्याने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-११-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) संबंधीत कंत्राटदार यांना नोटीस बजावण्यात आलेली आहे. सदर कंत्राटदाराची अनामत रक्कम जप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) नाही.
(४) संयुक्त पंचनामा करणेत आलेला आहे. नुकसान भरपाई अदा करणेची कार्यवाही महसुल विभागाकडून प्रस्तावित आहे.

---

**टिपेश्वर (जि.नागपूर) अभयारण्याला व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित करण्याबाबत**

**(३०) ८८६३१ (११-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टिपेश्वर (जि.नागपूर) अभयारण्य वाघाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे संरक्षित क्षेत्र असून अभयारण्यात सद्यस्थितीत असलेल्या वाघांची संख्या पाहता विदर्भातील पेंच, ताडोबा, मेळघाट व्याघ्र प्रकल्पाप्रमाणेच टिपेश्वर अभयारण्यालाही व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित करण्याची गरज निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९७७ पासून आजपर्यंत अभयारण्याचा विकासच झाला नाही व शासनाने कोणतीही आर्थिक तरतूद केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टिपेश्वर अभयारण्यास व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत तातडीने निर्णय घेऊन कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

टिपेश्वर अभयारण्याच्या विकासाकरीता सन २०१४-१५,सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये विविध योजनांतर्गत अनुक्रमे रु.११८.०७ लक्ष, रु. १८६.५५ लक्ष व रु. ५६३.५१ लक्ष उपलब्ध करुन देण्यात आले असून सदर निधी खर्च करण्यात आलेला आहे.

(३) टिपेश्वर अभयारण्य क्षेत्र व त्यामध्ये असलेल्या वाघांची संख्या ही राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाद्वारे प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक तत्वांची पूतर्ता करीत नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व वैद्यक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या कागदपत्रांच्या दुय्यम प्रतीकरिता एक हजार रुपये शुल्क आकारण्याच्या निर्णयाबाबत

**(३१) ८८६९९ (१६-०८-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व वैद्यक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या दुय्यमप्रती, साक्षांकित प्रती, पडताळणी, कागदपत्रांच्या दुय्यम प्रतीकरिता सर्व प्रती मिळून अधिकतम एक हजार रुपये शुल्क आकारण्याचा शासनाने निर्णय घेऊन सदर सर्व महाविदयालयांना सूचित केले असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासनाच्या या निर्णयामुळे विदयार्थी व पालकांनी या विरोधात अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, यामुळे शासनाने सदर निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-११-२०१७) :**(१)अंशतः खरे आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या दिनांक २०/०१/२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये शुल्क आकारणीबाबत महाविद्यालयांना सूचना देण्यात आल्या होत्या.
(२) नाही, हे खरे नाही. तथापि, दिनांक १७/०३/२०१७ रोजीच्या लोकसत्ता या दैनिक वृत्तपत्रात या विषयासंदर्भात बातमी प्रसिध्द झाली होती.
(३) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी फेरविचार करुन दिनांक ०८/०५/२०१७ रोजी सुधारित परिपत्रक निर्गमित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील सागरेश्वर अभयारण्याला संरक्षण कुंपण करण्याबाबत**

**(३२) ८८८३० (२१-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील सागरेश्वर अभयारण्याला शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधलेले संरक्षण कुंपण काही ठिकाणी नसल्याने अभयारण्यातील प्राण्यांची सुरक्षा धोक्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सागरेश्वर अभयारण्यातील प्राण्यांची सुरक्षा होण्याच्या दृष्टीने नव्याने कुंपन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सागरेश्वर अभयारण्याच्या एकूण ३८.९९५ कि.मी. परिसिमेपैकी ३७.३९५ कि.मी. लांबीचे साखळी जाळी कुंपणाचे बांधकाम करण्यात आले आहे. साखळी जाळी बांधकामाकरीता शिल्लक असलेल्या १.६०० कि.मी. हद्दीवर सद्यस्थितीत काटेरी झुडप, लाकडी, दगडी स्वरुपाचे कुंपण तयार करण्यात आले आहे.
क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांचे मार्फत दिवस-रात्र गस्त करण्यात येते. ग्रामसभेमध्ये तलाठी व ग्रामसेवक यांचेमार्फत ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यात येते. अभयारण्यात वन्यप्राण्यांची सुरक्षा, अभयारण्य क्षेत्रातील कुंपणाची संरक्षण, निगराणीची कामे नियमीतपणे तपासणीद्वारे करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली वैद्यकीय महाविदयालयाच्या आणि मिरज सिव्हील हॉस्पिटलमधील निवासी डॉक्टरांच्या जागा कमी केल्याबाबत**

**(३३) ८८८४६ (२१-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली वैद्यकीय महाविदयालयाच्या आणि मिरज सिव्हील हॉस्पिटलमधील निवासी डॉक्टरांच्या ९२ जागा कमी करण्याचा निर्णय नुकताच माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णय घेण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, निवासी डॉक्टरांच्या जागा कमी केल्यास सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि कर्नाटकातून दररोज हजारोंच्या संख्येने उपचारासाठी येणा-या रुग्णांवर त्याचा परिणाम होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-११-२०१७) :**(१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व इंदिरा गांधी महाविद्यालय (मेयो) येथील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३४) ८९९०२ (१९-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय (मेडीकल) व इंदिरा गांधी महाविद्यालय व रूग्णालय (मेयो) येथील चतुर्थ श्रेणी कर्मचारी, सफाई कामगार, स्वयपांकी, धोबी, शिपाई, कक्षसेवक यांची ३५० पदे रिक्त असून फक्त १०० जण कार्यरत असल्यामुळे रूग्णाची गैरसोय व रूग्णालयात अस्वच्छता निर्माण होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-१०-२०१७) :**(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर तसेच इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे काही प्रमाणात रिक्त आहेत, हे अंशत: खरे आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर येथे चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची मंजूर पदे ८२८ इतकी असून त्यापैकी २८२ पदे रिक्त आहेत. इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर येथे चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या ३२१ मंजूर पदांपैकी ८७ पदे रिक्त आहेत. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे काही प्रमाणात रिक्त असली तरी उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने रुग्णांची सोय व स्वच्छता यावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली जात आहे.

(२) गट-ड संवर्गातील पदभरतीवर शासनाचे अंशत: निर्बंध आहेत. परंतु गट-ड संवर्गातील अनुकंपा तत्त्वावर तसेच लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने चतुर्थश्रेणी संवर्गातील पदे भरण्यास मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे साफसफाईची कामे बाहयस्त्रोतामार्फत संस्था स्तरावर निविदा प्रक्रियेद्वारे राबविण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार नागपूर येथील दोन्ही संस्थामधील साफसफाईची कामे बाहयस्त्रोताद्वारे करुन घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यात विना परवानगीने वृक्षतोड होत असल्याबाबत

**(३५) ९०२६२ (१६-०८-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात मोडकळीस आलेल्या वृक्षाची तोड केली जात असून वृक्ष कापण्यासाठी कोणत्याही प्रकारची परवानगी घेण्यात आलेली नसून जिल्ह्यात ठिकठिकाणी तोडलेल्या लाकडांचा खच पडलेला असताना वन विभागाचे याकडे लक्ष नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा वनपरिक्षेत्रातून कापणीसाठी मंजूर झालेल्या झाडा व्यक्तिरिक्त जंगलातील झाडे तोडून त्या झाडांमध्ये मिसळले जातात व झाडे नियमानुसार तोडल्याचे दर्शविण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकार वनविभागाच्या अधिकाऱ्यांना माहित असतांनाही वनविभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही या वन अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.

महाराष्ट्र वृक्षतोड विनियमन अधिनियम, १९६४ अनुसार अनुसुचित वृक्षांची तोड करण्याकरीता परवानगी देण्याचे अधिकार वृक्षतोड अधिकारी म्हणून वनपरिक्षेत्र अधिकारी यांना आहेत. तसेच शासन अधिसूचना दिनांक १.८.२०१७ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार बिगर अनुसुचित वृक्षतोडीस परवानगी देण्याचे अधिकार वनक्षेत्रपालांना प्रत्यायोजित करण्यात आले आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वेरागड (ता.चिखली, जि.बुलढाणा) संग्राहक तलावाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३६) ९०३९२ (१२-०८-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वेरागड (ता.चिखली, जि.बुलढाणा) संग्राहक तलावाचे काम पूर्ण होण्यासाठी सन २०१४ पासून प्रक्रिया सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परंतु सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठीचा तलाव प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावाच्या कामास सुप्रमा व निधी उपलब्ध करुन देवून सदर तलावाचे कामे तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२६-१०-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) मौजे वैरागड, ता.चिखली, जि.बुलडाणा येथील साठवण तलावाची साठवण क्षमता १.५० MM३ पेक्षा जास्त असल्याने या प्रकल्पास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA) यांची मान्यता घेणेबाबत मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे यांना दि.९/८/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. प्राधीकरणाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सात महाविद्यालयांना वैद्यकीय परिषदेकडून (एमसीआय) परवानगी नसतानाही त्यांचा प्रवेश प्रक्रियेत समावेश करण्यात आल्याबाबत**

**(३७) ९०४१७ (१९-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सात महाविद्यालयांना वैद्यकीय परिषदेकडून (एमसीआय) परवानगी नसतानाही त्यांना प्रवेश प्रक्रियेत समावेश करण्यात आली असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ८१० असल्यामुळे या महाविद्यालयांमधील प्रवेशांबाबत संदिग्धता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-११-२०१७) :**(१) हे खरे नाही. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता नसलेल्या महाविद्यालयांचे प्रवेश करण्यात आलेले नाहीत.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हयात ६ लक्ष ४० हजार वृक्षांची लागवड केली जाणार असल्याबाबत**

**(३८) ९०४५९ (११-०८-२०१७). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या हरित महाराष्ट्र उपक्रमांतर्गत अकोला जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हयात ६ लक्ष ४० हजार वृक्षांची लागवड केली जाणार असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान जाहिर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वृक्ष लागवडीचे उदिष्ट साध्य करुन ते जतन करण्याबाबत प्रशासनातर्फे कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-११-२०१७) :**(१) होय, खरे आहे.
(२) सन २०१७ च्या पावसाळयात वृक्ष लागवडीच्या उद्दीष्टांनुसार कामे करण्यात येवून, लागवड केलेल्या वृक्षांचे संगोपन, संरक्षण, पाणी देणे इत्यादि उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भडगाव (जि.जळगांव) तालुक्यात हिरव्यागार झाडांची तोड होत असल्याबाबत**

**(३९) ९०५३४ (१६-०८-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव (जि.जळगांव) तालुक्यात हिरव्यागार झाडांची सर्रासपणे तोड होत असल्याचे नुकतेच माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैधरित्या तोडलेली झाडे ट्रॅक्टरने भरदिवसा छुप्या मार्गाने वाहतूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अवैध वृक्षतोडीचा प्रमाण दिवसेंदिवस वाढत असतांना तसेच पर्यावरणाचा ऱ्हास होत असतानाही याकडे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-११-२०१७) :**(१) भडगाव तालुक्यातील वनक्षेत्रात सर्रासपणे मोठया प्रमाणावर अवैध वृक्षतोडीच्या घटना माहे जुन, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेल्या नाहीत. तथापि, भडगाव तालुक्यात एकुण ४ वनगुन्हयांच्या घटना घडल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

परंतु खाजगी जमिनीवरील/मालकी क्षेत्रातरील वृक्षांची विनापरवानगीने तोड करुन त्यातील माल अवैधरीत्या वाहतुक होत असल्याच्या काही घटना पाचोरा वनपरिक्षेत्रातील, भडगाव वनपरिमंडळात आढळून आलेल्या आहेत.
(३) खाजगी जमिनीवरील/मालकी क्षेत्रातील वृक्षांची विना परवानगीने अवैध वृक्षतोडीच्या मालाची अवैध वाहतुकीबाबत पाचोरा वनपरिक्षेत्रात एकूण १६ वनगुन्हे नोंदविण्यात आले आहे.
(४) व (५) महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ चा भंग करणारे अवैध वाहतुकीचे वनगुन्हे पैकी १४ वनगुन्हे प्रकरणी आवश्यक चौकशी करुन वृक्ष अधिकारी यांनी कार्यवाही केली आहे. दोन प्रकरणात चौकशी सुरु आहे.

---

**मराठवाडयात जलयुक्त शिवार अभियानातील कामे पूर्ण झाली नसल्याबाबत**

**(४०) ९०६०८ (२१-०८-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयात दुष्काळमुक्तीसाठी हाती घेतलेल्या जलयुक्त शिवार अभियानातील पहिल्यावर्षी निवडलेल्या सुमारे ४ हजार कामे अद्यापीही पूर्ण झालेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जुनी कामे करण्यासाठी मुदतवाढ देऊनही अधिकाऱ्यांना ही कामे वेळेत पूर्ण न करता मंजूर कामे पूर्ण झाल्याचे दर्शविण्यासाठी गुणवत्तेकडे दुर्लक्ष होऊन निकृष्ट दर्जाचे कामे झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-११-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ अंतर्गत मराठवाडा विभागात जुलै, २०१७ अखेर ७९९५२ कामापैकी ७९६२२ कामे पूर्ण करण्यात आली असून ३३० कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील गैरकारभाराबाबत**

**(४१) ९११०२ (१६-०८-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मागील दोन वर्षांपासून अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून कोणतेही काम न करता मागील वर्षभरापासून त्यांना वेतन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय

(२) तसेच गोंदिया मुख्यालयी राहत असल्याची खोटी माहिती शासनाला पुरवून घरभाडे भत्ता घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकरणाबाबत बायोमॅट्रीक मशीन लावण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-११-२०१७) :**(१) हे खरे नाही. कोणत्याही कर्मचाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास काम न करता वेतन देण्यात येत नसून नियमितपणे कामावर हजर असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यास वेतन देण्यात येते.

(२)चौकशी करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही. बायोमॅट्रीक मशीन लावण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत नाही तथापि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथे बायोमेट्रिक मशिन दिनांक १६.११.२०१५ रोजी प्रस्थापित करण्यात आलेले आहे.

(४) वरील प्रमाणे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमध्ये कांदळवनांची होणारी तोड रोखण्याबाबत**

**(४२) ९१८१० (१६-०८-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील कांदळवनाच्या तोडीबाबत शासनामार्फत होत असलेली चौकशी पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मुंबईमधील नागरिकांसाठी कांदळवनामध्ये पर्यटनकेंद्र उभारण्यासाठी लोकप्रतिनिधीकडून मागणी होत असून, शासन स्तरावर कोणतीच कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, मुंबईमध्ये कांदळवनाची होणारी तोड रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, शासनाने तोड करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१७)** :(१) सन २०१३ ते सन २०१७ पर्यंत कांदळवनाच्या अवैध वृक्षतोडीच्या ५ घटना आढळून आलेल्या असून त्यांची चौकशी करण्यात आलेली आहे. याव्यतिरिक्त कांदळवनाची प्रामुख्याने तोड न करता त्यावर अनधिकृत भराव, डेब्रीज टाकून अतिक्रमण होत असल्याच्या काही घटना आढळून आलेल्या आहेत. सदर अनधिकृत अतिक्रमणाविरुद्ध चौकशी अंती आतापर्यंत अनाधिकृत आढळून आलेल्या ३७०५ झोपड्याचे निष्कासन करण्यात आलेले आहे.

(२) मा.उच्च न्यायालयाने कांदळवन क्षेत्रावर कामास प्रतिबंधीत केले आहे. वनेत्तर कामे करावयाची असल्यास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेणे न्यायालयाने बंधनकारक केले आहे. कांदळवन क्षेत्रामध्ये पर्यटन केंद्राबाबत वन (संवर्धन) कायद्यांतर्गत प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. प्रस्ताव प्राप्त झाल्यावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता पुढीलप्रमाणे पावले उचलण्यात आलेली आहेत:-

१. तटीय क्षेत्रातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता सन २०१२ मध्ये कांदळवन कक्षाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

कांदळवन कक्षांतर्गत मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि मिरा - भाईंदर क्षेत्रातील कांदळवनाचे प्रभावीपणे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता सन २०१३ मध्ये मुंबई कांदळवन संधारण घटकाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

२. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका ३२४६/२००४ मध्ये दिलेल्या आदेशानुसार राज्य शासनाकडून कांदळवनाला वैधानिक दर्जा व संरक्षण प्राप्त होण्याकरिता सरकारी जमिनीवरील कांदळवन क्षेत्र “राखीव वने ” म्हणून आणि खाजगी जमिनीवरील कांदळवन क्षेत्र “वने” म्हणून घोषित करण्यात येत आहेत. त्यानुसार राज्यातील तटीय सात जिल्ह्यातील १५०८७ हे. क्षेत्र भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ अंतर्गत राखीव वने म्हणून अधिसूचित करण्यात आलेले आहे.

३. मुंबई कांदळवन संधारण घटकाकडून मुंबई व मुंबई उपनगरातील नगरपालिका व पोलिसांच्या सहकार्याने विविध ठिकाणी अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे

(४) वन विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्रात कांदळवनाची तोड, अनाधिकृत भराव, अतिक्रमणाविरुद्ध वन गुन्हयाची नोंद करण्यात आलेली आहे. आतापर्यंत १६ आरोपींना अटक करण्यात आलेली असून त्यांचे विरुद्ध न्यायालयामध्ये ७ खटले दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच कांदळवन क्षेत्रात अनाधिकृत भराव करताना १३ इतकी वाहने जप्त करण्यात आलेली आहेत. सदर वाहनापैकी ८ इतकी वाहने शासन जमा करण्यात आलेली आहेत.

महसूल विभाग, पोलीस विभाग आणि महानगरपालिका ह्यांच्या सहकार्याने विविध ठिकाणी अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. मुंबई कांदळवन संधारण घटकाकडून मुंबई, मुंबई उपनगरातील २०१५-१६ ते जुलै २०१७ पर्यंत सुमारे ३७०५ अनाधिकृत झोपड्यांचे निष्कासन करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वैद्यकीय परिषदेची मान्यता नसताना ७ महाविद्यालयांचा समावेश प्रवेश प्रक्रियेत करण्यात आल्याबाबत**

**(४३) ९१८२२ (१६-०८-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया दिनांक २८ जून पासून सुरु होणार असून वैद्यकीय परिषदेने जाहीर केलेल्या महाविद्यालयांच्या यादीत ७ महाविद्यालयाना वैद्यकीय परिषदेची मान्यता नसतानाही त्यांचा समावेश या प्रवेश प्रक्रियेत करण्यात आलां आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याही वर्षी प्रवेश प्रक्रिया व अभ्यासक्रमाला उशिराने सुरवात होणे व परवानगी न मिळाल्यास विद्यार्थ्यांची गैरसोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत कायम स्वरूपी धोरण आखून सुद्धा अशा प्रकारे गोंधळ प्रवेश प्रक्रियेत होत असतो या बाबत शासन चौकशी करून त्याबाबत पुनर्विचार करणार आहे काय

(४) नसल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-११-२०१७) :**(१)नाही, हे खरे नाही. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता नसलेल्या महाविद्यालयांचे प्रवेश करण्यात आलेले नाहीत.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा वनपरिक्षेत्र (जि.जळगांव) अंतर्गत प्रचंड मोठया प्रमाणावर अवैध वृक्षतोड सुरु असल्याबाबत**

**(४४) ९२०१४ (१८-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा वनपरिक्षेत्र (जि.जळगांव) अंतर्गत मोठया प्रमाणावर अवैध वृक्षतोड सुरु असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-११-२०१७) :**(१) वनक्षेत्रात मोठया प्रमाणावर अवैध वृक्षतोडीच्या घटना माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेल्या नाहीत. परंतू खाजगी मालकीतील जमिनीवर विनापरवानगीने वृक्षतोड करण्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

(२) खाजगी जमिनीवरील/मालकी क्षेत्रातील वृक्षांची विनापरवानगीने वृक्षतोडीच्या मालाची अवैध वाहतुकीबाबत पाचोरा वनपरिक्षेत्रात एकुण १६ वनगुन्हे नोंदविण्यात आले आहे.
(३) व (४) महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियमन, १९६४ चा भंग करणारे, अवैध वाहतुकीचे १६ वनगुन्हे पैकी १४ वनगुन्हे प्रकरणी आवश्यक चौकशी करुन वृक्ष अधिकारी यांनी कार्यवाही केली आहे व उर्वरीत २ प्रकरणात चौकशी सुरु आहे.

---

**जळगाव तालुक्यात गाळमुक्त धरण व शिवार या अभियानाचा शुभारंभ झाल्यानंतर ट्रॅक्टर, जेसीबी व इतर उत्खनन करणारी अवजारे गायब झाल्याची घटना**

**(४५) ९२१६० (२१-०८-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव तालुक्यातील चिखली, घोडसगाव, पिंप्री अकराऊत, सातोंड माळेगाव व पिंप्रीपंचम या ठिकाणी भेट देऊन गाळमुक्त धरण व शिवार या अभियानाचा शुभारंभ मा.जलसंधारण मंत्री यांच्या हस्ते झाल्यानंतर त्यावेळी तेथे असलेली ट्रॅक्टर, जेसीबी व इतर उत्खनन करणारी अवजारे दुसऱ्याच दिवशी गायब झाल्याची घटना नुकतीच माहे मे,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी लावण्यात आलेले उद्घाटनाचे फलकदेखील गायब झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३०-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.
जळगाव जिल्हयातील पिंप्री अकराऊत येथील पाझर तलावाच्या ठिकाणी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या अभियानाचा शुभारंभ केला असून या पाझर तलावातून गाळ वाहतुकीचे काम मे, २०१७ अखेरपर्यंत चालू होते. आज अखेर ५०० घ.मी.गाळ स्थानिक शेतकऱ्यांनी त्यांचे सोईनुसार वाहून नेलेला आहे.
(२) हे खरे नाही
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी तालुक्यातील अनेक गावातील नागरिकांवर वाघाने हल्ला केल्याबाबत

**(४६) ९२३६८ (२१-०८-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (जि. चंद्रपूर) तालुक्यातील अनेक गावातील नागरीकांवर वाघाने हल्ला करून दोन जणांचा मृत्यू व आठ लोक जखमी झाली तसेच हळदा आणि पदमापूर भूज येथील दोन व्यक्तीवर वाघाने हल्ला केल्यामूळे एकाचा मृत्यू तर एक गंभीर जखमी झाल्यामुळे ग्रामस्थांनी हळदा गावात आदोलन करुन वनविभागाने कोणतीही दखल न घेतल्यामूळे ब्रम्हपूरी तालुयातील शेकडो नागरिकांनी वाघाला पकडा किंवा ठार मारा या मागणीसाठी मुख्य वनसंरक्षक कार्यालय, चंद्रपूर येथै आंदोलन केल्याची माहिती दिनांक २३ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांच्या संरक्षणांकरीता आणि नागरिकांच्या मागणीवर वनविभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-११-२०१७) :**(१) व (२) ब्रम्हपूरी वन विभागातील दक्षिण ब्रम्हपूरी परिक्षेत्रात वाघीणीच्या हल्ल्या ३ व्यक्ती जखमी तर एका महिलेचा मृत्यू झाला आहे. सदर घटनांनतर सदर वाघीणीस बेशुध्द करुन जेरबंद करण्याच्या आशयाचे स्थानिक गावकऱ्यांनी दिनांक ०५.०६.२०१७ रोजी निवेदन दिले आहे.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यक कायदेशीर कार्यवाही पूर्ण करुन सदर वाघीणीला बेशुध्द करुन जेरबंद करण्याकरीता कार्यवाही सुरु करण्यात आली. तथापि दरम्यानच्या काळात पावसामुळे वनक्षेत्रात दाट झाडोरा वाढल्याने सदर वाघिणीचा मागोवा घेण्यास यश आले नाही.

श्री.मधुकर रघुनाथ टेकाम रा. पदमापुर यांचा दिनांक २१.०६.२०१७ रोजी वाघाच्या हल्ल्यात मृत्यु झाला आहे. सदर घटनेनंतर स्थानिक ग्रामस्थांनी दिनांक २३.०६.२०१७ रोजी मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर यांचे कार्यालयात आंदोलन केले.

मानवी जिवितास धोका ठरणाऱ्या वाघीणीला ठार मारण्याच्या अनुषंगाने आवश्यक कायदेशीर कार्यवाही पूर्ण करुन पोलीस विभागाचे कमान्डोच्या सहाय्याने सदर उपद्रवी वाघीणीचा मागोवा घेण्यात आला. तथापि उपरोक्त कार्यवाहीच्या अनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने वाघिणीला ठार मारण्याच्या आदेशाला Set aside असा निर्णय दिल्याने सदर वाघीणीचा मागोवा घेण्यात येऊन दिनांक १०.०७.२०१७ रोजी सदर उपद्रवी वाघिणीला बेशुध्द करुन जेरबंद करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**मेळघाट (जि.अमरावती) जंगलाला भीषण आग लागून**
**हजारो हेक्टर वनजमिन नष्ट झाल्याबाबत**

**(४७) ९२५२० (२१-०८-२०१७). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) जंगलाला भीषण आग लागून हजारो हेक्टर वनजमिन जळून गेल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीमुळे करोडो रुपयांचे वनजमीन नष्ट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-११-२०१७) :**(१) व (२) मेळघाट (जि.अमरावती) वनक्षेत्रामध्ये प्रादेशिक तसेच वन्यजीव वनवृत्तांचा समावेश होतो. अमरावती (प्रादेशिक) वनवृत्तांतर्गत पूर्व मेळघाट व पश्चिम मेळघाट वनविभाग असून त्या विभागाचे एकूण क्षेत्र ११५४.६१ चौ.कि.मी. आहे. माहे जानेवारी, २०१७ ते जुन, २०१७ मध्ये पूर्व मेळघाट वनविभाग चिखलदरा व पश्चिम मेळघाट वनविभाग, परतवाडा विभागामध्ये ४८३ आग लागण्याची प्रकरणे घडले असून त्यात एकुण ४४३३.८४ हे.वनक्षेत्र जळाले आहे. त्यामध्ये रु.३,२४,५१५/- आर्थिक नुकसान झालेले आहे.

तसेच अमरावती वन्यजीव (मेळघाट) अंतर्गत ३ वन्यजीव विभाग असून त्या विभागाचे एकूण क्षेत्र १९५०९५.९१ हे. इतके आहे. या वनक्षेत्रात माहे जानेवारी, २०१७ ते जुन, २०१७ या आगीच्या हंगामात एकूण ३९६ घटना घडल्या आहे. त्यामध्ये ८७६९.९९७ हे. क्षेत्र जळाले आहे. त्यामध्ये रु.५,२०,९०६/ आर्थिक नुकसान झालेले आहे.

(३) व (४) मेळघाट वनक्षेत्रातील आग किंवा वनवणवा हा बहुतांशी मानवी हस्तक्षेपातून निर्माण होणारी घटना आहे. सदर आगीच्या घटनाबाबत वनगुन्हयांची नोंद करण्यात आली असून प्रकरणी संपूर्ण चौकशी करुन भारतीय वन अधिनियम १९२७ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील अनेक गावात एक वर्षापासून**
**आशा स्वयंसेविका कार्यरत नसल्याबाबत**

**(४८) ९३२८७ (२१-०८-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील अनेक गावात एक वर्षापासून आशा स्वयंसेविका कार्यरत नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आशा स्वयंसेविकेची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर पदे तात्काळ भरणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,?

**डॉ. दीपक सावंत (०१-११-२०१७)** :(१) अंशत: खरे आहे,

देऊळगांव राजा तालुक्यामध्ये गारखेड व दे.मही येथे आशा स्वयंसेविकांनी राजीनामा दिल्यामुळे दोन पदे रिक्त आहे.
(२) ग्रामसभेकडून तालूका आरोग्य अधिकारी यांचे कडे आशा संवयंसेविका पदाकरिताचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतरच प्रस्तावातील महिलेस तालुका आरोग्य अधिकारी मार्फत नियुक्ती पत्र देण्यात येते. मात्र, मागील एका वर्षापासुन वारंवार लेखी सुचना येऊन सुद्धा दोन्ही ग्रामसभेकडून ठराव प्राप्त न झाल्यामुळे आशा स्वयंसेविकांचे दोन पद रिक्त आहे.
(३) आशा स्वयंसेविकेची निवड ग्रामसभेत करण्यात येत असल्यामुळे रिक्त पदे भरण्यासाठी तालुका स्तरावरून तालूका वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचा-यांच्या मार्फत ग्रामपंचायत कार्यालयास ग्रामस्तरावर होणा-या ग्रामसभेत आशा स्वयंसेविकेची निवड करणे बाबत कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेंदुर्जन (ता.सिंदखेडराजा जि.बुलढाणा) येथील जलयुक्त शिवार अंतर्गत सिमेंट नाला बांधाचे काम अपूर्ण अवस्थेत

**(४९) ९३२९२ (२१-०८-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेंदुर्जन (ता.सिंदखेडराजा जि.बुलढाणा) येथील जलयुक्त शिवार अंतर्गत सिमेंट नाला बांधाचे काम चालू असताना बंद पाडण्यात आल्याचे नुकतेच माहे जून,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जलयुक्त शिवार अंतर्गत सिमेंट नाला बांधाचे काम सुरु असतांना श्री.संजय त्र्यंबक कायंदे व इतर यांनी कामात अडथळे आणून सदर नाल्यामध्ये गट नं ५७९ मध्ये जाण्या-येण्यास रस्ता असल्याचे सांगून नाला बांधण्याचे काम बंद पाडले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात तहसिलदार, सिंदखेडराजा यांना श्री.अनिल बाबुराव कायंदे यांनी निवेदन सादर करुनही अदयापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५)असल्यास, चौकशीनुसार नाला खोलीकरणाचे काम पूर्ववत सुरु करुन पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-११-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार, सिंदखेड राजा यांनी प्रस्तुत प्रकरण महसुली प्रकरण म्हणून पंजीबद्ध केले असून सर्व संबंधितांना नोटीसा काढण्यात आल्या आहेत. या प्रकरणात अर्जदार यांचे उत्तर व पुरावे याकरिता प्रकरण पुढील तारखेवर ठेवण्यात आले असून प्रकरण तातडीने निकाली काढण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयातील १८४ गावांचा समावेश इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये असलेबाबत**

**(५०) ९४३१० (२१-०८-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पश्चिम घाट क्षेत्रात अतिसंवेदनशील क्षेत्रामध्ये (इकोसेन्सेटिव्ह झोन) जिल्हयातील १८४ गांवे डॉ.कस्तुरीरंगन समितीच्या शिफारशीमध्ये समाविष्ठ आहेत, इकोसेन्सेटीव्ह झोनची प्रारुप अधिसुचना केंद्रीय पर्यावरण वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालयाने जारी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बहुतांश गावांची उपजिविका शेती व शेतीपूरक व्यवसायावर अवलंबून असल्याने अनेक गांवाचा इकोन्सेसेटिव्ह झोनमध्ये समावेशासाठी विरोधासाठी कोल्हापूर जिल्हयातील शाहूवाडी व राधानगरी तालुक्यातील ग्रामस्थांनी तहसिल कार्यालयावर दिनांक २ मे,२०१७ रोजी वा त्या सुमारास मोर्चे काढले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विषयावर दिनांक २७ एप्रिल २०१७ पर्यंत हरकती सादर करणे आवश्यक असल्याने योग्य कारणांसह वेळेत हरकती व सुचनांचे ठराव सादर करावेत अशा सुचना मा.महसूल मंत्री तथा कोल्हापूर जिल्हयाचे पालकमंत्री यांनी आवाहन केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्व समावेशक गावांचा फेरसर्व्हेक्षण करुन जी गांवे वगळणे आवश्यक आहेत ती गांवे वगळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-११-२०१७) :**(१) केंद्रीय पर्यावरण, वन आणि जलवायू परिर्वतन मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक २७.०२.२०१७ रोजी पश्चिम घाट क्षेत्राची अतिसंवेदनशिल क्षेत्राची (इकोसेन्सिटिव्ह झोन) ची प्रारुप अधिसूचना जारी केली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

(४) व (५) केंद्रीय पर्यावरण, वन आणि जलवायू परिर्वतन मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक २७.०२.२०१७ रोजी पश्चिम घाट क्षेत्राची अतिसंवेदनशिल क्षेत्राची (इकोसेन्सिटिव्ह झोन) ची प्रारुप अधिसूचना जारी केली आहे. उपरोक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने केंद्र शासनास राज्य शासनाचे अभिप्राय देण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.